# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स — २२६९०००७
E-mail : mcm.dte@gmail.com Internet : www.dte.org.in

Registered AD

का.क्र.१८/तंशिसं/अल्प.विभाग /ईओटीपी/२०१६/४२
दिनांकः- २६/०२/२०१६

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्र निकेतने / अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र /
हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी महाविद्यालये
महाराष्ट्र राज्य.

**विषय : राज्यशासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागातर्फे राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता रोजगाराभिमुख प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना सन-२०१५-१६ करीता.... ( EOTP )**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील अल्पसंख्यांक विदयार्थ्यांसाठी राज्य शासनाच्या रोजगारभिमुख फी प्रतिपुर्ती योजनेअंतर्गत ( EOTP ) सन २०१५-१६ करीता वेगवेगळया वर्तमानपत्रात सोबत जोडलेली जाहिरात देण्यात आलेली आहे. तसेच जाहिरात या संचालनालयाचे संकेतस्थळ **http:www.dtemaharashtra.gov.in/EOTP** वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व या योजनेबाबतची अधिक माहीतीही संकेत स्थळावर देण्यात आलेली आहे.

तथापि याबाबत आपणांस असे सुचित करण्यात येत आहे की अल्प मुदतीचे अभ्यासक्रम राबविण्यात येत असलेल्या संस्थांनी आपल्या संस्थेचे Login ID (DTE Code) & Password (ज्या संस्था योजनेसाठी असलेले पासवर्ड विसरले असतील किंवा माहिती नसेल अशा संस्था सिस्टीमद्वारे देण्यात आलेले "Forgot Password" च्या पर्यायाने प्राप्त करु शकतात ) वापरुन संस्थेमध्ये राबविण्यात येत असलेल्या अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमांचे ऑनलाईन पध्दतीने मंजुरीसाठी पाठवून या कार्यालयाकडून ऑनलाईन पध्दतीने मंजुरी प्राप्त करुन घ्यावी. जेणेकरुन मंजुरी प्राप्त झालेल्या संस्थांना ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर अभ्यासक्रमाच्या फी प्रतिपूर्ती योजनेसाठी भरता येतील व विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. तसेच आपल्या संस्थेत शिकत असलेले सर्व अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना आपल्या स्तरावर या योजनेबाबत कळविण्यात यावे / माहिती करुन देण्यात यावी. जेणेकरुन जास्तीत जास्त अल्पसंख्यांक विद्यार्थी सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेवुन सदर योजनेचा लाभ घेतील.

प्रोग्राम सर्व संचालन संस्था विभाग

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

---

पृ. क्र.तंशिसं/विकाना/ MINORITY /२०१६/ 577
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक : - 2 MAR 2016

प्रति,
प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एचएमसीटी संस्था
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यांत येते की, पत्रात नमुद केल्याप्रमाणे अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता रोजगाराभिमुख प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना (EOTP) ची माहिती आपले संस्थेतील विद्यार्थ्यांना देण्यांत यावी, जेणेकरुन अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

**(गुलाबराव ठाकरे)**
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर